# शिफारस पत्र

सौ. माधुरी हेमंत शिंदे यांनी –

" श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी,
या संस्थेच्या शैक्षणिक
नियोजन व प्रशासनाचा
चिकित्सक अभ्यास "

या विषयावरील प्रबंध प्रा. डॉ. आर. एन्. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. हा प्रबंध शिक्षणशास्त्रातील एम्. फिल्. या पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांस सादर केला. संशोधनाची माहिती मूलभूत असून जी माहिती इतर ग्रंथातून घेतली आहे, त्याचा उल्लेख त्या त्या ठिकाणी केला आहे म्हणून हे शिफारस पत्र देण्यात आले.

प्रा. डॉ. आर्. एन्. इंगोले
( मार्गदर्शक )

चंद्रकांत मोरे
प्राचार्य
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
बार्शी

दिनांक :- मे, १९९६.
स्थळ :- बार्शी.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

# -: ऋण निर्देश :-

" श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, या संस्थेच्या शैक्षणिक नियोजन व प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास " या संशोधन विषयाचा अभ्यास प्रा. डॉ. आर. एन्. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. विषय निश्चितीपासून ते कार्य पूर्ण होईतोपर्यंत आलेल्या सर्व प्रकारच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांचे मिळालेले सहकार्य, वेळच्या वेळी मिळालेले कुशल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन आणि त्यांनी संशोधनासाठी दिलेली प्रेरणा यामुळेच मी हा प्रबंध पूर्ण करू शकले. त्यांची मी अत्यंत ऋणी आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शीचे प्राचार्य मा. श्री. चंद्रकांत मोरे यांनी संशोधन पूर्ततेसाठी केलेले सहकार्य आणि मार्गदर्शन बहुमोल आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे चेअरमन डॉ. बी. वाय्. यादव व जनरल सेक्रेटरी श्री. मोहिते दादा यांनी संस्थेतील आवश्यक ती सर्व कागदपत्रे पहाण्यास परवानगी दिली व सहकार्य केले याबद्दल त्यांचीही मी ऋणी आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शीचे प्राध्यापक डॉ. टी. बी. पाटील, प्रा. डॉ. सी. एन्. लांडगे तसेच ग्रंथपाल श्री. हजारे यांनी प्रबंध पूर्ण करण्यास केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानते. वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राध्यापक श्री. सुहास राऊत व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर येथील प्राध्यापिका सौ. मिनाक्षी राऊत यांचेही त्यांच्या मदतीबद्दल आभार.

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथील ग्रंथपाल श्री. इंगळे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार. सौ. पंडित मॅडम व श्रीमती चौधरी मॅडम यांच्या बहुमोल सहकार्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

भेटी दिलेल्या निरनिराळ्या शाखांमधील शाखाप्रमुख व शिक्षक, प्राध्यापकांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. निरनिराळ्या शाखांतील शाखा- - प्रमुखांनी प्रश्नावल्या भरून दिल्या, त्यांचे मी आभार मानते. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, प्राध्यापक यांनी मुलाखती व चर्चा याद्वारे संशोधनासाठी बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल आभार मानते.

वेळच्या वेळी टंकलेखनाचे काम पूर्ण करून त्याच्या संगणकावर प्रिंटस् काढून देणारे डाटालिंक कॉम्प्युटर्सचे प्रोप्रा. श्री. संतोष जोशी यांची मी अत्यंत आभारी आहे, तसेच प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मी ऋण व्यक्त करते.

MHShinde

( सौ. माधुरी हेमंत शिंदे )